
जनसंपर्क कक्ष
महाराष्ट्र टाइम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUN 2018

# विद्यापीठात २१ ला योग शिबिर

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर





सध्याच्या धावपळीच्या युगात प्रत्येकजण आपल्या शरीराची काळजी घेतो. अर्थात त्याचे स्वरूप कमी-अधिक प्रमाणात असू शकेल किंवा काळजी घेत असतानाही शरीराकडे लक्ष देण्यास फारसा वेळ मिळत नसेल. त्यासाठी कमी वेळात 'योगा' करून आरोग्याची काळजी घेणे शक्य आहे. याचीच महती सांगणारा आंतरराष्ट्रीय योगदिन गुरुवारी (ता. २१) साजरा होत आहे. यानिमित्त महाराष्ट्र टाइम्स, शिवाजी विद्यापीठ आणि सिद्धगिरी मठ यांच्या संयुक्त विद्यमाने योग शिबिराचे आयोजन केले आहे.

## मटासह विद्यापीठ, सिद्धगिरी मठातर्फे आयोजन

गुरुवारी सकाळी ६.३० वाजता शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात योग शिबिर होईल. आंतरराष्ट्रीय योगदिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या या शिबिरात 'योग' या विषयाची शास्त्रीय माहिती, योगाचे महत्त्व, फायदे याविषयी तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे. योग शिबिरासाठी हेल्थ पार्टनर म्हणून मुख्य प्रायोजक अवित्रा इंटरनॅशनल प्रा. लि. चे ट्रेलीस हेयर सोल्युशन्स आहेत.

वस्तुतः शरीर, मन आणि आत्मा यांना एकत्र आणणे म्हणजे योगाभ्यास असे मानले जाते. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात वाढलेल्या धावपळीमुळे आरोग्याकडे दुर्लक्ष होऊ लागले आहे. परिणामी माणसाच्या जीवनात तणाव, व्याधी राहू लागले आहेत. माणसाची बिघडत चाललेली हालचाल, अस्थिरता, एकटेच स्वतःशी मोठ्याने बोलणे, आदी लक्षणे साहजिकच वाढू लागली. नोकरीसाठी ये-जा, तेथील काम, घरी आल्यानंतरही काम, हे सगळं मॅनेज करता करता दिवस कमी पडू लागला आहे. आजची ही बिझी लाइफस्टाइल तणावग्रस्त बनली आहे. त्यामुळेच योगाभ्यासाला अधिक महत्त्व आले असून, २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योगदिन म्हणून जगभर साजरा केला जाणार आहे. याच दिवशी सकाळी ६.३० वाजता विद्यापीठातील लोककला केंद्रात शिबिर होणार आहे. शिबिराचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. अधिक माहितीसाठी ९६८९८८६६३० या क्रमांकावर संपर्क साधावा.



सध्याच्या धावपळीच्या युगात माणूस स्वास्थ्य हरवून बसला आहे. निरोगी आयुष्यासाठी जीवनात योगा हा अविभाज्य घटक बनला पाहिजे. त्यासाठी दररोज वीस मिनिटे राखून ठेवली पाहिजेत. योगाचे महत्त्व कळण्यासाठी शिवाजी विद्यापीठ प्रयत्नशील आहे.

**- डॉ. देवानंद शिंदे,**
कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ



योगाने केवळ शरीर नव्हे तर मनाचे आरोग्य जपले जाते. विविध घटकांसाठी यापूर्वी योगवर्गाचे नियोजन केले आहे. त्याचा पोलिस कर्मचाऱ्यांना फायदा झाला. सहजता योगातून जपली जाते. निरोगी शरीर आणि मन स्थिर राहण्यासाठी योगा महत्त्वाचा आहे.

**- डॉ. रेखा सारडा,**
निसर्गोपचार तज्ज्ञ

18 JUN 2018
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नंदकुमार मोरे यांचा शिवसेनेतर्फे सत्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** चंदगडी भाषेतील संशोधन आणि प्रसिद्धीसाठी योगदान दिल्याबद्दल शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागातील प्रा. नंदकुमार मोरे यांचा शिवसेनेतर्फे मंगळवारी सत्कार करण्यात आला.



कोल्हापुरात मंगळवारी चंदगडी भाषेचा सन्मान केल्याबद्दल शिवसेनेतर्फे शिवाजी विद्यापीठातील प्रा. नंदकुमार मोरे यांचा सत्कार कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याहस्ते करण्यात आला. यावेळी प्रवीण पालव, रवी चौगले, संजय पवार, डी. टी. शिर्के, व्ही. डी. नांदवडेकर उपस्थित होते.

जागतिक किर्तीचे भाषातज्ज्ञ डॉ. गणेश देवी यांनी संशोधन आणि संपादित 'भारतीय भाषांचे लोक सर्वेक्षण' या पुस्तकात मराठी भाषेत चंदगड बोलीला चौथे स्थान मिळाले आहे. हे पुस्तक आता जगभरातील भाषा अभ्यासकांना उपलब्ध झाले आहे. त्यामुळे 'चंदगडी' भाषा जगभर प्रवास करणार आहे. चंदगडकरांसाठी ही अभिमानाची बाब आहे. हलकर्णी (ता. चंदगड) येथील रहिवासी असणारे प्रा. नंदकुमार मोरे हे विद्यापीठातील मराठी अधिविभागात कार्यरत आहेत. त्यांनी या पुस्तकासाठी कष्ट घेतले. संशोधनाद्वारे माहिती संकलित केली. त्यांनी मराठी चंदगडी बोलीचा सन्मान केल्याबद्दल शिवसेनेतर्फे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते सत्कार झाला. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख संजय पवार, रवी चौगले, प्रवीण पालव, विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

18 JUN 2018 लोकमत

# गवत, नारळाचा विद्यापीठाला हातभार

## पाच लाखांचे उत्पन्न : वृक्ष संवर्धनावर होतो खर्च

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** गवत, विविध रोपे, चिंच आणि नारळ यांच्या विक्रीतून शिवाजी विद्यापीठाच्या उत्पन्नवाढीला हातभार लागत आहे. या विक्रीतून वर्षाकाठी विद्यापीठाला सुमारे पाच लाख रुपये मिळतात.

विद्यापीठाचा परिसर ८५० एकरांमध्ये पसरलेला आहे. वृक्षांचा आणि मोकळा परिसर असलेल्या ६०० एकर परिसरात गवत उगविते. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये अनेकदा ते अज्ञातांकडून पेटविण्याचा प्रकार होतो. या आगीमुळे झाडांची हानी होते. त्यामुळे विद्यापीठातर्फे दरवर्षी निविदा पद्धतीने या गवताची विक्री केली जाते. त्यातून सुमारे चार लाख रुपयांचे उत्पन्न मिळते. पर्यावरणशास्त्र विभाग, प्रौढ निरंतर शिक्षण विभाग आणि विद्यापीठाच्या मुख्य इमारत परिसरात चिंच आणि लोककला केंद्राच्या मागील बाजूस नारळाची झाडे आहेत. त्यांच्या विक्रीमधून साधारणत: २५ हजार रुपये मिळतात. हे उत्पन्न विद्यापीठ परिसरातील झाडांच्या संवर्धनासाठी खर्च केले जाते. गेल्या वर्षी संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या विहिर परिसरात नारळाची १६१ झाडे लावली. त्यात यावर्षी ४० झाडांची भर पडणार आहे.

### सव्वा लाख रोपांची विक्री

विद्यापीठातील वनस्पतिशास्त्र अधिविभागातील लीड बॉटनिकल गार्डनद्वारे स्थानिक, डोंगरी परिसरातील विविध प्रजातींच्या रोपांची नाममात्र दरात विक्री केली जाते. काही सामाजिक संस्थांना ती मोफत दिली जातात. दरवर्षी विविध रोपांच्या विक्रीतून सुमारे एक लाख रुपयांचे उत्पन्न मिळते. गेल्या वर्षी विभागाने सव्वा लाख रोपे वितरित केली. त्यातील सुमारे ४० हजार रोपांच्या विक्रीतून दीड लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले असल्याचे वनस्पतिशास्त्र अधिविभागाचे प्रमुख प्रा. डॉ. डी. के. गायकवाड यांनी सांगितले.

> “आग लागून झाडांची हानी होऊ नये म्हणून गवत आणि पक्ष्यांनी खाऊन राहिलेल्या फळांची विक्री केली जाते. पैसे मिळविणे हा त्यामागील उद्देश नाही. जैवविविधतेला बळ देण्यासाठी यावर्षी नारळ, आवळा आणि चिंचेची झाडे लावली आहेत. फळझाडांमध्ये स्थानिक प्रजातींची झाडे आवर्जून लावली जात आहेत.
>
> -डॉ. व्ही. एन. शिंदे, उपकुलसचिव, उद्यान विभाग, शिवाजी विद्यापीठ